ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.XI/May 2012;pp.1-4

Research Paper

जागतिकीकरण : भारतीय समाजावरील परीणाम

डॉ. भारत एम. राठोड
शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय,
अर्जुनी/मोर., जि. गोंदिया

प्रस्तावना :–

विकास व आधुनिकीकरण या विसाव्या शतकातील महत्वपूर्ण संज्ञा आहेत; परंतू त्या संज्ञा आता कालबाहय ठरविण्यात आल्या आहेत त्यांच्या ऐवजी एकविसाव्या शतकात जागतिकीकरण, जागतिक अर्थव्यवस्था, जागतिक पर्यावरण, जागतिक खेडे इत्यादी संज्ञा बीनबोभाट वापरल्या जात आहेत. रशियन महासत्तेच्या अस्तानंतर, जागतिक बँकेच्या अधिपत्याखाली संपूर्ण गरिब समाजालाच प्रस्तुत संज्ञानी वेठीस धरलेले आपल्या निदर्शनास येते. या बिनबोभाट स्थित्यंतरात आर्थिक दृश्ट्याा मागास घटक सर्वंकश पिचलेला घटक होय.

आजची विज्ञान व तंज्ञज्ञानातील प्रगती मानवी प्रज्ञेला अवाक करणारी आहे. असे असतांना सुध्दा, चंगळवाद आणि आळशी वृत्ती तिचिच अपत्ये आहेत. अतिशय वेगाने होणाऱ्या सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक आणि मानसिक बदलामुळे सामाजिक शास्त्रातील सिद्धांतही परिवर्तनशील होणार नाहीत, यात नवल ते कसले?त्यामुळे मानवी व्यवस्थेच्या स्थीर स्वरूपातील वैशिश्ट्याांबद्दल जी वैज्ञानिक परिभाषा सामाजिक शास्त्रांनी मांडली आहे. त्यातील अंदाजात साशंकता निर्माण होतांना दिसत आहे.

उद्दिष्टे :–

1.जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करणे.
2.जागतिकीकरणाचे स्वरूप स्पष्ट करणे
3.जागतिकीकरणामुळे शैक्षणिक धोरणात झालेला बदल
4.भारतीय समाजावरील परिणाम स्पष्ट करणे

प्रस्तूत शतकात मानवतेपुढे मोठी आव्हाने उभी आहेत. मानव समाजापुढे काय वाढून ठेवलेले आहे?संघर्ष आणि संहारक युद्धे, की परस्पर शांतामय सहजीवन? अखिल मानव समाजाच्या गरजा पुरविणारा आर्थिक विकास व समृद्धी, की आर्थिक विशमता, शोशण, आणि केव्हाच न संपणारे दारिद्र्या?विशेषतः तथाकथित अविकसित राष्ट्रांत कोटयावधी लोक निरक्षरता आणि अनारोग्याच्या अगतिकतेत आयुष्य कंठत आहेत.

''पाचशे वर्षांपूर्वी वस्तुविनमय पद्धती अस्तित्वात होती. कार्ल मार्क्सच्या कालखंडापूर्वीपासूनच भांडवलवाद (पूंजिवाद) अस्तित्वात आहे. कार्ल मार्क्सने "Communist Manifesto" नावाचा ग्रंथ लिहीला, त्या दरम्यान सहा वर्षापर्यंत जागतिक मंदी होती.'' 1991–92 पासून उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचा प्रारंभ झाला. वीस वर्शांचा काळ लोटला परंतू हा कालावधी इतका जास्त नाही, की या संकल्पनाचे चांगल्यारितीने मूल्यमापन होऊ शकेल. पण इतका कमी सुद्धा नाही, की उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या मूळ हेतूचे आकलन होऊ शकणार नाही.

जागतिकीकरण ही एक महत्वपूर्ण संकल्पना आहे. आर्थिक सुधारणेच्या पॅकेजमधील एक महत्वपूर्ण तत्व, एक प्रेरक शक्ती, एक विचारधारा किंवा नववसाहतवाद किंवा नवसाम्राज्यवाद, हे पर्यायी शब्द जागतिकीकरणासाठी वापरले जातात. जागतिक हीत तसेच सुखसमृद्धीची भूल देऊन संपूर्ण जगावर आपले वर्चस्व सिद्ध करणे, हाच जागतिकीकरणामागचा मूळ हेतू आहे. संपूर्ण जगाला एका बाजाराखाली आणून त्यांच्या समस्यांची चर्चा करणे व संपूर्ण जगाला एका वैश्विक ग्रामात (Global Village) परिवर्तित करणे, हा जागतिकरणाचा मूळ उद्देश आहे.

1947 साली भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर पाश्चिमात्य देशातील भांडवलशाही व सोव्हिएट रशियातील साम्यवाद या दोन परस्पर विरोधी प्रणालींचा पाठपुरावा न करता भारताने लोकशाही समाजवाद, मिश्र अर्थव्यवस्था विनियोजन हा मधला मार्ग चोखळला. परंतु चाळीस वर्शे या तिसऱ्या मार्गावर वाटचाल केल्यानंतर भारतालाही 1991 साली चलन संकटात सापडल्यानंतर मुख्य बाजारी अर्थव्यवस्था उदारीकरण व जागतिकीकरणासाठी आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घ्यावा लागलेला आहे. आता असे सर्वसाधारणपणे मानले जाऊ लागले, की भारताचे भविष्य जागतिक मुक्त अर्थव्यवस्थेशी अतूटपणे जोडले गेलेले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विलीन होण्याशिवाय भारतालाही दुसरा पर्याय नाही, हे कितपत खरे आहे, याचे उत्तर प्रस्तुत शोधनिबंधातून शोधण्याचा प्रयत्न संशोधकाचा हेतू आहे.

अमर्त्य सेन यांच्या मते, ''जागतिकीकरण अंतिमतः एक फार मोठी लाभदायक शक्ती आहे, परंतु त्याच्या पाठीशी पुरेशा व चांगल्या राष्ट्रीय धोरणांचा पाठींबा हवा, तरच जगात जागतिकीकरणामुळे सुबत्ता येऊ शकेल''. प्रातःकाली सूर्याचा एक किरण अंधाराला मागेसारून नव्या दिवसाची सुरूवात करतो, त्याचप्रमाणे जागतिकीकरण हे देखिल देशातील व्यापाराला एक नवीन चालना देते.

1991 साली विश्व बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांचा ''स्ट्रक्चरल ॲडजेस्टमेंट प्रोग्रॅम'', अर्थात अर्थव्यवस्थेची पुनर्रचना कार्यक्रम स्वीकारल्यानंतर व गॅट करारावर स्वाक्षरी केल्यानंतर 1 जानेवारी 1995 रोजी जागतिक विश्व व्यापार संस्था स्थापन झाल्यानंतर भारताला या संस्थांच्या नितीनियमानुसार आपले आर्थिक धोरण ठरविणे अपरिहार्य झालेले आहे. त्यामुळे आपल्या आर्थिक प्रभुसत्तेला मुरड घालावी लागेल.

1990 साली साम्यवादी अर्थव्यवस्था कोसळल्यानंतर भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्याय राहिला नाही. या व्यवस्थेचे आता जागतिकीकरण होत आहे. विश्व बँक, नाणेनिधी, 1995 साली नविन अस्तित्वात आलेली व्यापारी संस्था या जागतिकीकरणाचा पाठपुरावा करीत आहेत. याचा अर्थ असा नव्हे की, दारिद्र्या, बेरोजगार, आर्थिक शोषण, विशमता, अज्ञान, अनारोग्य, अन्याय हे प्रश्न सोडविण्यात मुक्त भांडवलशाही अर्थव्यवस्था यशस्वी होत आहे किंवा विकसित व अविकसित देशांमधील दरी कमी होत आहे. हे प्रश्न सोडविले नाही तर जागतिकीकरण नव्या आर्थिक साम्राज्यवादाची नांदी ठरेल. अशा

साम्राज्यवादाच्या आक्रमणात बहुराष्ट्रीय कंपण्या आघाडीवर राहतील त्यांचे आक्रमण रोखण्यात अविकसित राष्ट्रांची सरकारे पूर्णपणे असमर्थ ठरतील. कारण बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आर्थिक शक्तीच्या तुलनेत अविकसित देश अगदीच दुर्बल आहेत आणि जागतिक व्यापारी संस्थेच्या करारावर स्वाक्षरी केल्यावर स्वतंत्र निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य गमावून बसले आहेत. संगणक व दूरसंचार या नविन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सर्व जगावर आर्थिक प्रभुत्व स्थापन करणे बहुराष्ट्रीय कंपन्यांना अगदी सोपे होणार आहे. हे नविन तंत्रज्ञान अविकसित देशांना शाप न ठरता वरदान ठरायचे असेल, तर अविसित देशांनी संगठीत प्रयत्न केले पाहिजेत. पेटंट व बौद्धिक अधिकारांना संरक्षण देण्याच्या नावाखाली अविकसित देशातील पारंपारिक ज्ञान भांडाराचा कब्जा घेण्याचा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रयत्न रोखला पाहिजे.

जागतिकीकरणामुळे शिक्षण हा विषय मूठभर लोकांचा बनू पाहत आहे. शिक्षण हा विषय शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. तर पालक, समाज आणि अर्थव्यवस्थेशी निगडीत बनलेला आहे. आज तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण सर्व मानवी प्रश्न सोडवू शकते. मानव्यशास्त्राची गरज नाही असे मत मांडले जात आहे. तंत्रशिक्षणामुळे मानवाची भौतिक प्रगती होऊ शकते; परंतु मानवाच्या सामाजिक जाणिवांची, मनाची, वर्तनाची, नितिमत्तेची प्रगती होत नाही. त्यासाठी कला, क्रिडा, सामाजिक शास्त्रांच्या शिक्षणाची गरज असते. या गोष्टींकडे भांडवलशाही व्यवस्था दुर्लक्ष करीत आहे. मानव्यशास्त्र विरूद्ध तंत्रज्ञान असा वाद निर्माण करून सामाजिक शास्त्राचे ज्ञान, शिक्षण तत्वहिन आहे असेही मत व्यक्त केले जात आहे. आज उच्च नैतिक जीवन जगणारा, मानवी सुख–दुःखाचा विचार करणारा, सामाजिक भान असणारा विद्यार्थी शिक्षण व्यवस्थेला नकोसा झाला आहे. तर तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेला, भांडवलशाहीच्या शोशणाला पोषक ठरणारा आत्मकेंद्री विद्यार्थी हवा आहे.

शासन शिक्षणावरील खर्च कमी करीत आहे. विनाअनुदान व स्वायत्त शिक्षण व्यवस्था निर्माण करून गरीबांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे प्रयत्न चालु आहेत. शिक्षण व्यवस्था खाजगी यंत्रणेकडे सोपविणे समाजहितास घातक ठरणार आहे. तंत्रशिक्षण असो, किंवा मानव्य शास्त्राचे शिक्षण असो, ते सरकारी नियंत्रणाखालीच राहणे उचित आहे. शिक्षणावरील सरकारी नियंत्रण काढून घेतल्यास शिक्षण दिशाहीन व मुठभर लोकांपुरते मर्यादित राहणार. भारतीय राज्यघटनेत शिक्षणाचा अत्यंत गांभीर्याने विचार होवूनही शिक्षणक्षेत्र आज सर्वाधिक अस्थिर आहे. शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी योग्य मार्गाने होतांना दिसत नाही.

नव्या आर्थिक धोरणामुळे भारतात उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले, तेव्हा पासून भारताने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार करून समाजवादी अर्थव्यवस्थेला बगल दिली. प्रथम मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये सर्वसामान्य माणसाच्या हिताचा विचार केला आहे, असा प्रचार केला जाऊ लागला पण कालांतराने असे समोर आले, की सर्वसामान्यांसाठी मुक्त अर्थव्यवस्था ही एक मृत्यूघंटाच ठरू लागली आहे.

जातिकीकरणामुळे विविध संस्कृती, धर्म, भाषा आचार–विचार यांची मोठया प्रमाणात देवाण–घेवाण सुरू झाली आहे. आयात–निर्याती बरोबरच संस्कृतीचाही प्रसार होतो, त्यामुळे जुन्या मूल्यांऐवजी नविन मूल्ये रूजतात. अमेरिकन सांस्कृतिक जीवनाचाही भारतीय समाजावर फार मोठा परिणाम दिसून येऊ लागला आहे. चंगळवादाने मूळ धरले आहे. संयुक्त कुटुंब व्यवस्था हे खरे तर भारतीय संस्कृतिचे आदर्श वैशिश्ट्या, पण तिलाही धक्के बसू लागले आहेत. भारतिय संस्कृतिमध्ये व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना कधीही अतिरेकी स्वरूपाची नव्हती; परंतु अमेरिका व पाश्चात्यांच्या प्रभावाखाली अनेक भारतीय शहरात अमर्याद व्यक्ती स्वातंत्र्य उपभोगण्याकडेच कल दिसतो. भारतीय समाजमनाला भेडसवणारे हे एक तथ्य आहे. मूल्यांच्या घसरणीचा ओघ इतका प्रचंड आहे, की सध्याच्या शिक्षण व्यवस्थेसमोरील ती एक प्रमुख समस्या आहे. जागतिकीकरणाचे सर्वच घटकांवर वेगवेगळे परिणाम होतांना दिसून येत आहे.

1. राज्यधोरणाच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये सांगीतलेल्या धोरणांची पायमल्ली होत आहे. आर्थिक सत्ता व उत्पादन साधने यांचा संचय मोठया प्रमाणात काही मूठभर लोकांच्याच हाती झालेला दिसत आहे. उदा. टाटा, बिर्ला, अंबानी, बजाज इ.
2. जागतिकीकरणामुळे परदेशी उत्पादने व सेवा यांच्या मुक्त प्रवेशामुळे भारतीय उद्योगधंदे बंद पडले आहेत, तर काही बंद पडण्याच्या स्थितीत आहेत. यामुळे एकप्रकारे अनियंत्रित अशी भांडवलशाहीच निर्माण झाली आहे.
3. भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकामध्ये नमूद असलेल्या समाजवादी राज्याच्या संकल्पनेस बगल देऊन राज्यकर्ते नव्या आर्थिक धोरणाद्वारे भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करताहेत. शोषणाचा पायंडा अधोरेखित करताहेत.
4. भारतीय संविधानाचा मुख्य उद्देश आर्थिक, सामाजिक समता निर्माण करणे हा आहे, तर जागतिकीकरण निश्चितपणे आर्थिक विषमता, भेदभाव व अन्यायीव्यवस्था निर्माण करणारे ठरणार आहे.
5. भारताचे संविधान मुलभूत उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण करून गोरगरिब व वंचित घटकांसाठीच सेवा, सुविधा व त्यांच्या प्रगतीसाठी उपाययोजना करते तर जागतिकीकरणामुळे स्पर्धात्मक उद्योग निर्गुतवणूक प्रक्रियेद्वारे निस्प्रभ करून खाजगी क्षेत्रास विकले जात आहेत.
6. कल्याणकारी राज्याची संकल्पना जागतिकीकरणामुळे मोडीत निघाली असल्यामुळे कामगारांची आर्थिक पिळवणूक होत आहे. भारत सरकारच्या वित विभागाच्या 1999 च्या अहवालानुसार जागतिकीकरणामुळे सामाजिक व आर्थिक असुरक्षितता निर्माण झालेली आहे.
7. सामाजिक असमतोल व विशमता कमी करण्याकरीता संविधान आरक्षण धोरणाचा अवलंब करते, याउलट जागतिकीकरणाच्या व्यवस्थेत आरक्षण धोरणास यत्कींचतही स्थान नाही. त्यामुळे उघड व छूपे सामाजिक असंतुलन आकारास येत आहे.
8. जागतिकीकरणाने खाजगी क्षेत्राची एकाधिकारशाही स्थापित होवून सामाजिक दुभंगलेपणाचा फार मोठा धोका निर्माण झालेला आहे.

संदर्भग्रंथ :–

1. डॉ. पद्माकर दुभाशी, 'जागतिकीकरण, उदारीकरण आणि अर्थकारण', पुणे : विद्याप्रकाशन, 2006.
2. चंद्रकांत केळकर, 'नाणेनिधी व जागतिक बँक यांचा नववसाहतवाद'', मुंबई : लोकवाङ्मयगृह, 2001.
3. व्ही. पं. खेर, 'जागतिकरण समस्या आशय आणि अनुभव', पुणे : दिलीपराज प्रकाशन, 2002.
4. ॲडमिरल विश्णू भागवत, 'जागतिकीकरणः नवीन गुलामगीरी', नागपूर, समता प्रकाशन, 2006.